रे. दिवाणी मुकदमा क्र. १४२/२०१३ मधील निशाणी क्र. १७१ वरील आदेश
(शहाजी करांडे वि हणमंत करांडे वगैरे)
(CNR No. MHSN130005102013)

१. प्रवादी यांनी सदरचा अर्ज हा कैफियत दुरुस्त होणेकामी दाखल केलेला आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र. १ हे वादीचे नात्याने वडील असून प्रवादी क्र.२ हे थोरले चुलते होय. प्रवादी क्र.१ व २ यांचे वडील मरण पावलेवर प्रवादी क्र.२ यांचे नांव एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून महसुल दप्तरी नोंदवले गेले. त्यानंतर प्रवादी क्र.१ व २ यांचे दरम्यान पटेना म्हणून त्यांनी आपले बायकामुलांसह विभक्त होवून सोईप्रमाणे वाटण्या करुन घेतल्या. असे असताना पुन्हा जमिनीमधील सुधारणा, कर्ज प्रकरणे या कारणास्तव अडचणी येवू लागलेने पाहुण्यांच्यासमक्ष १९८४ साली रितसर तोंडी वाटप केले. त्याप्रमाणे २२/०७/१९८७ ला फेरफार क्र. २२८ हा अस्तीत्वात आला. वाटप झाले त्यावेळी पोपट रामचंद्र करांडे यांच्यासोबत जी बैठक झालेली त्याविषयी ०४/०३/१९९५ रोजी समजुतीचे टिपण नोंदविणेत आलेले होते. या सर्व बाबींचा उल्लेख यापूर्वी कैफियतीत करणेचा राहून गेला. संबंधीत कागदपत्र अचानक प्रवादींना आढळून आलेने त्याअनुषंगाने कैफियतीमध्ये दुरुस्ती होवून मिळणेकामी प्रवादींनी सदरचा दुरुस्तीचा अर्ज सादर केलेला आहे.

२. वादी यांनी आपले म्हणणे नि.१७३ वर दाखल केलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे या दावेचे कामी वादी यांच्या दाव्याला प्रवादी यांनी ब-याच वर्षापूर्वी कैफियत दाखल केली त्यानंतर २०१४ साली मुद्दे काढले. तसेच त्यानंतर पुन्हा

वेळोवेळी जसे वाद उदभवले त्याप्रमाणे २०१५ व २०१७ साली अतिरीक्त मुददे व जास्तीचे मुददेपण काढणेत आले. वादी यांचा पुरावा त्यानंतर पूर्ण झालेवर प्रवादी यांचा पुरावा देणे प्रलंबित असताना दाव्याचे अनुषंगाने जो बचाव यापूर्वी सादर केलेला आहे तो समर्पक नसलेने प्रवादी यांनी नवीन बचाव सादर करणेसाठी सदरचा अर्ज सादर केलेला आहे. वादी यांनी त्यामुळे प्रवादींचा अर्ज रदद होणेविषयी विनंती केली.

३. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री पी. टी. जाधव व वादी यांचे विद्वान वकील श्री डी.एन. घाडगे यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | प्रवादी यांनी सादर केलेला नवीन बचाव कैफियतीमध्ये सामील होणे आवश्यक आहे काय ? | नाही |
| २ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

४. प्रवादी क्र. १ व २ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या दरम्यान पूर्वी वाटप झालेले होते. त्याप्रमाणे महसुल दप्तरी नोंदी धरणेत आलेल्या असून त्याप्रमाणे ज्या बैठकी घेणेत आल्या व जी टिपणे तयार करणेत आली होती ती या दावेचे कामी दाखल करणे आवश्यक आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे यापूर्वी ज्या वकीलांद्वारे त्यांनी

कैफियत दाखल केली होती त्या वकीलांनी तसे प्रवादींचे म्हणणे न मांडलेने प्रवादी आपला बचाव योग्यप्रकारे सादर करु शकलेले नाहीत. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री पी. टी. जाधव यांनी युक्तीवाद सादर केला की प्रवादी यांचा दावा आता त्यांच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे प्रवादी यांनी सदरची दुरुस्ती ही पुरावा सादर करणेपूर्वी मागीतलेली असलेने ती मान्य करणेविषयी विनंती केलेली आहे. प्रवादी यांचे विद्वान वकील यांच्या म्हणण्याप्रमाणे पुरावा सादर करणेपूर्वी कैफियतीमध्ये त्या अनुषंगाने दुरुस्ती न केलेस नवीन सादर केलेला पुरावा हा प्रवादीच्या हिताविरोधी गणला जावू शकतो. या दावेचे कामी जर प्रवादीला कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन जास्तीचा पुरावा सादर करणेची संधी उपलब्ध होणेची असेल तर त्यासाठी कैफियतीमध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. वादी यांना त्याअनुषंगाने उलटतपास घेवून त्यांची बाजू मांडणेचीही संधी उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांनी तशी दुरुस्ती मंजूर करणेविषयी म्हटले आहे. प्रवादी यांचे विद्वान वकील श्री. डी. एन. घाडगे यांनी युक्तीवाद सादर केला की प्रवादी यांना यापूर्वी पुरेशी संधी उपलब्ध असताना त्यांनी तसा बचाव यापूर्वी कधीही सादर केलेला नव्हता. प्रवादी यांनी वादीचा उलटतपास घेतला असून त्यामध्येही अशाप्रकारचा बचाव कुठेही सादर करणेत आलेला नाही. वादी यांच्या विद्वान वकीलांच्या म्हणण्याप्रमाणे दावेचे सुनवाईचे कार्यवाही अंतर्गत दिरंगाई करणेसाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

५. या दावेचे कामी प्रवादी यांनी सादर केलेला अर्ज जर पाहिला तर प्रवादी यानी १९८४–८५ साली वाटप झाले होते याबाबतचे कथन कैफियतीमध्ये सामील

करणेविषयी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने त्यांनी फेरफार क्र. ४६३० हा प्रवादी क्र. २ याची ए.कु.मॅ. म्हणून नोंद झालेबाबतचा फेरफार व प्रवादी क्र. १ व २ यांच्या दरम्यान फेरफार क्र.२२८ ता २२/०७/१९८५ ने झालेल्या वाटपाची नोंद महसुल दप्तरी धरल्याविषयीचे म्हटलेले आहे त्यानंतर प्रवादी क्र.१ व २ व त्यांचे नातेवाईक पोपट रामचंद्र करांडे यांच्या समवेत ०४/०३/१९९५ रोजी जे टिपण लिहणेत आलेले त्याविषयीचा उल्लेख केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी यांनी सदरचा अर्ज हा दिरंगाई करणेसाठी केला असलेचे म्हटलेले आहे.

६. या दावेचे कामी वादींचा पुरावा पूर्ण झालेला आहे व दावा प्रवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रवादी यांना जी दुरुस्ती कैफियतीमध्ये करुन पाहिजे आहे त्याविषयी कोणत्याही प्रकारचा उल्लेख यापूर्वी दाखल असलेल्या कैफियतीमध्ये त्यांनी कुठेही केला नसलेचे दिसून येते. फेरफार क्र. ४६३० किंवा फेरफार क्र. २२८ हेपण त्यांनी या दावेचे कामी दाखल केलेले नाहीत. त्यामुळे प्रवादी म्हणतात त्याप्रमाणे अशाप्रकारचा बचाव सादर करणेसाठी त्यांना आवश्यक संधी उपलब्ध झाली नाही असे त्यांना आता म्हणता येवू शकत नाही. प्रवादी यांनी यापूर्वी जो बचाव सादर केलेला आहे त्याअनुषंगानेच त्यांनी उलटतपास घेतलेला आहे. प्रवादी यांनी केलेला अर्ज हा तांत्रीक गोष्टींचा फायदा घेत सादर केला असलेचे दिसून येते. वास्तवात प्रवादी यांनी जी कैफियत यापूर्वी दाखल केलेली त्याअनुषंगानेच त्यांनी त्यांचा सरतपास किंवा उलटतपास सादर केलेला आहे. प्रवादी यांच्या उलटतपासातील पुराव्यावरुन त्यांनी

यापूर्वी वाटपाविषयी कोणतेही म्हणणे याप्रकारे मांडले नसलेचे दिसून येते. प्रवादी यांनी सुचविलेली दुरुस्ती जर पाहिली तर ती दावेचे कामी कोणताही नवीन प्रकारचा बचाव सादर करणेसाठी दाखल केली असलेचे दिसून येत नाही. प्रवादी यांनी जी कारणे सादर केलेली आहेत त्यामध्ये काही तथ्य आहे असे म्हणता येवू शकत नाही. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

७. प्रवादी यांनी सदरचा अर्ज हा कैफियत दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रवादी यांनी ज्या विनंत्या केलेल्या आहेत त्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

**आदेश**

१. प्रवादी क्र. १ ते ७ यांचा अर्ज रदद करणेत येतो.

२. प्रत्येक प्रवादी यांनी २००/– रुपये प्रत्येकी वादीला अदा करावी.

Vijay Ramchandra Gharal
Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2019.10.05 13:27:26 +05'30'

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – ०४/१०/२०१९ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 04/10/2019 |
| Order signed by the | : 04/10/2019 |

Presiding Officer on.

Order uploaded on : 05/10/2019